# मेटाची सुवर्णमहोत्सवी वाटचाल... एक दृष्टीक्षेप

प्रविण कोल्हे, कार्यकारी अभियंता
pravinkolhe82@gmail.com



**सन २००७-०८ मध्ये सरळसेवा प्रविष्ट अभियंत्यांसाठी महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक मार्फत आयोजित प्रतिष्टापण प्रशिक्षणात सहभागी झालेले प्रशिक्षणार्थी (तुकडी क्र.-१)**

***इमा आप: शिवतम ॥***
***इमा सर्वस्य भेषिजी ॥***
***इमा राष्ट्रस्य वर्धिनि ॥***

"हे पाणी अत्यंत पवित्र आहे, हे पाणी सर्वांचे संवर्धक आहे, हे पाणी राष्ट्राची भरभराट करते" असे वरुण सूक्तातील ऋचांमध्ये नमुद आहे. या तीन वाक्यातच पाण्याविषयीची आपली संस्कृती सामावलेली आहे. जलसंपदा विभागामध्ये काम करत असताना या माध्यमातुन राष्ट्राच्या भरभराटीमध्ये खारीचा वाटा उचलण्याची संधी मिळाल्याचा आम्हाला नेहमीच अभिमान वाटत असतो. मात्र याची सुरुवात झाली ती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि. ५ व ६ फेब्रुवारी २००५ दरम्यान घेतलेल्या महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षेपासुन...

या परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर दि. १० सप्टेंबर २००७ रोजी आम्ही जलसंपदा विभागामध्ये प्रवेश केला, तेव्हापासुन आजतागायत विभागामध्ये अनेक अनुभव आले आहेत. जलसंपदा विभागामध्ये प्रवेश करतानाच प्रथम आमची ओळख झाली ती महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक या संस्थेची... अजुनही तो पहिला दिवस मला स्पष्ट आठवतो. मेटाच्या प्रवेशद्वारापासुन सुबक रांगोळी काढण्यात आली होती आणि आम्ही सभागृहात स्थानापन्न झाल्यावर मेटाचे तत्कालीन संचालक मा. श्री. नारायणराव घुगे यांनी आमचे स्वागत केले. विभागाचे तत्कालीन सचिव मा. श्री. व्यंकटराव गायकवाड यांनी त्याप्रसंगी आयोजित उद्घाटन कार्यक्रमामध्ये आम्हाला मार्गदर्शन केले होते. त्यांनी विभागात प्रवेश केल्याबद्दल आमचे स्वागत करुन विभागाचा इतिहास व

आतापर्यंत केलेल्या आव्हानात्मक कामांचा उल्लेख करुन आम्हाला भविष्यातील कामांच्या जबाबदारीची जाणीव करुन दिली होती. त्यानंतर सर्व प्रशिक्षणार्थींच्या वतीने मी मनोगत व्यक्त करताना म्हणालो होतो की विभागातील सर्वोच्च पदावरील अधिकाऱ्याने आमच्यासारख्या नवप्रवेशित अधिकाऱ्यांना दिलेल्या या मार्गदर्शनामुळे विभागात काम करायला उर्जा मिळाली व वरीष्टांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही विभागाची प्रतिमा उजळवण्यासाठी निश्चित प्रयत्न करु.

१० सप्टेंबर २००७ या दिवसांपासुन ते ९ सप्टेंबर २००८ पर्यंतच्या आमच्या एक वर्षाच्या प्रशिक्षणाची सुरुवात अशाप्रकारे झाली. या एक वर्षाच्या कालावधीमध्ये आम्ही महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक अंतर्गत तसेच क्षेत्रीय स्तरावर विविध ठिकाणी प्रशिक्षण घेतले. या दरम्यान सर्व काही आलबेल होते असे म्हणण्याचे धारिष्ट्य मी करणार नाही, मात्र आहे त्या परिस्थितीमध्ये जे काही करण्यासारखे होते ते सर्व तत्कालीन संचालक श्री. घुगे व त्यांच्या टिमने मनःपुर्वक केले. त्यांच्यामुळे आमच्या प्रशिक्षण कार्यक्रमाला दिशा मिळाली होती व आम्हाला योग्य ते प्रशिक्षण मिळावे, आमची गैरसोय होऊ नये, यासाठी ते सतत स्वतः क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांना सुचित करत होते. प्रशिक्षण देणारे देत होते आणि (काही) घेणारे घेत होते. मात्र आता विभागात काम करताना लक्षात येते की, ज्या उद्देशाने महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक या संस्थेची स्थापना दि. २० मे १९६४ साली "अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय" या नावाने झाली होती, ती उद्दीष्ट्ये पुर्ण करण्यात संस्थेला निश्चितच काही अंशी यश प्राप्त झालेले आहे तथापि, अजुनही मोठा पल्ला गाठायचा आहे.

जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागातील सरळसेवा प्रविष्ट अधिकाऱ्यांचा प्रतिष्टापण प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे, सर्व तांत्रिक अभियंत्यांना आवश्यक ते पायाभुत व विशेष प्रशिक्षण देणे, अभियंत्यांसाठी अनिवार्य असलेली अर्हता/व्यावसायिक परीक्षा घेणे या प्रकाराची प्रमुख कामे या संस्थेमार्फत गेली ५० वर्ष अविरत केलेली आहेत. प्रशिक्षणाची तत्वसरणी अभ्यासली असता, आपल्या लक्षात येते की प्रशिक्षण म्हणजे सुसुत्रित पध्दतीने अभिवृत्ती, कल, संकल्पना, ज्ञान, भुमिका व कौशल्य प्राप्त करुन त्याद्वारे कार्यक्षमतेमध्ये निरंतन प्रगती करणे एवढा व्यापक विचार यामध्ये केलेला आहे. मेटाच्या बाबतीत उपलब्ध माहितीवरुन मागील पन्नास वर्षाच्या कालावधीमध्ये मेटा तसेच संस्थेअंतर्गत असलेल्या प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र (RTC) यांचे माध्यमातुन सुमारे दिड लक्ष अभियंत्यांना ५००० पेक्षाही जास्त प्रशिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमातुन प्रशिक्षित करुन आजतागायत सुमारे १० लाख प्रशिक्षणार्थी मनुष्य दिवस निर्मिती करण्यात आली आहे. संख्यात्मक दृष्ट्या मेटाने निश्चितच चांगली कामगिरी बजावलेली आहे. सध्याच्या स्पर्धात्मक युगामध्ये संख्यात्मक कामगिरीसोबतच गुणात्मकदृष्ट्याही सर्वांगिण विवेचण होणे आवश्यक आहे असे मला वाटते. या संस्थेची आवश्यकता ही आजच्या मानव संसाधन विकासाच्या दृष्टीने निश्चितच महत्वाची आहे मात्र संस्थेची गुणात्मक कामगिरी व त्यामुळे विभागास मिळणारा परतावा हे तपासण्यासाठी योग्य ते कार्यतंत्र विकसित करण्याची आता गरज निर्माण झाली आहे. विशेषतः सध्याच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये अभियंत्यांना प्रशिक्षणासाठी प्रत्यक्ष नाशिक येथे उपस्थित राहुनच चाकोरीबद्द पध्दतीने दिले जाणारे प्रशिक्षण दुरशिक्षण अथवा ई-लर्निंगच्या माध्यमातुन देऊन, दिलेल्या प्रशिक्षणामुळे क्षेत्रीय स्तरावरील कामकाजामध्ये किती कार्यक्षमता वाढ झाली हे तपासणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

व्हिजन-२०२० च्या निमित्ताने या विषयावर सध्या विभागातील वरीष्ट अधिकाऱ्यांची चर्चा सुरु आहे. महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक या संस्थेची जडणघडण अधिक सर्वसमावेशक व कार्यक्षम करण्यासाठी परीवर्तन आवश्यक असुन, त्यासाठी योग्य ती पाऊले उचलण्यात येत आहेत. यासाठीच Government Process Re-engineering (GPR) या कार्यगटाची स्थापना करण्यात आली असुन त्यावर प्रशिक्षण विषयक प्रणाली अधिक सुटसुटीत, कार्यक्षम व माहिती तंत्रज्ञानाच्या वापरास अनुकुल करण्यासाठी नियोजन केले असुन, याची फळे येत्या कालावधील सर्वांना जाणवतीलच. मात्र हे साधत असताना क्षेत्रीय स्तरावरुनही प्रशिक्षणाच्या बाबतीत असलेला उदासीन दृष्टीकोण दुर होणे आवश्यक आहे. बऱ्याचदा प्रशिक्षणार्थी स्वतःच "आम्हाला प्रशिक्षणासाठी पाठविले" असे म्हणत नाव नोंदणी करत असतात आणि यातुन "पाठवलो म्हणुन आलो" हा चुकीचा दृष्टीकोन निदर्शनास येतो. ही मनोवृत्ती बदलवुन प्रशिक्षणार्थींनी "मी संबंधित विषयामध्ये भरीव ज्ञान प्राप्त करायला येथे आलो आहे, आणि त्याचा फायदा मला पुढे काम करताना होणार आहे", ही प्रेरणा घेऊनच प्रशिक्षणासाठी आल्यास, त्याचा फायदा संस्थेस व प्रशिक्षणार्थी या दोघांसह विभागास व पर्यायाने सर्वसामान्य नागरिकांना होईल. एकंदर पुरवठा आणि मागणी (Supply and Demand) या दोन्ही बाजुंनी योग्य ते परीवर्तन होणे आवश्यक आहे. संस्थेच्या बाबतीत ते त्यांच्या कार्यपध्दतीमधुन तर प्रशिक्षणार्थींच्या बाबतीत ते त्यांच्यासह त्यांच्या वरीष्टांच्या दृष्टीकोनातुन प्रतित होणे आवश्यक वाटते.

तैत्तरीयोपनिषदामध्ये गुरुकुलामधुन गृहस्थाश्रमामध्ये पदार्पण करणाऱ्या तरुणास केलेल्या उपदेशामध्ये ***"स्वाध्यायान्मा प्रमदः"*** हे सुभाषित नमुद आहे. महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा उत्तीर्ण होऊन जलसंपदा विभागामध्ये पदार्पण करणाऱ्या अभियंत्यासाठी देखील ते चपखल लागु आहे आणि कदाचित त्यामुळेच महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक या संस्थेच्या बोधचिन्हाखाली ते मुद्रित करण्यात आलेले असावे. त्याचा अर्थ "अभ्यासात आळस करु नका" असा असुन या सुभाषिताचा अंगिकार प्रत्येकाने करणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

लहान तोंडी मोठा घास घेतल्याबद्दल क्षमा मागुन, संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त, मी या संस्थेचा माजी विद्यार्थी म्हणुन मनःपुर्वक शुभेच्छा देतो. येत्या ५ वर्षामध्ये संस्थेचा नावलौकिक वाढुन देशातील तांत्रिक क्षेत्रातील आघाडीवरील प्रशिक्षण संस्थांच्या यादीमध्ये ही संस्था समाविष्ट व्हावी हीच अपेक्षा या प्रसंगी मी व्यक्त करतो. प्रस्तुत स्मरणिकेस व एकंदर सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल मी आयोजकांचे अभिनंदन करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र !